Annexure- I

**Maharashtra University of Health Sciences, Nashik**
**Nursing Faculty**
**Information of Subject-wise Intake as per College & University Recognition Permitted Seat-Matrix Chart Academic Year 2023 - 2024**

**Name of College: Anuradha College Of Nursing, Chikhili, Dist Buldhana**

| **UG Degree/PG Degree** | **Intake as per University /Council** | **Max. Seats Permitted by MUHS as per Teacher: Student Ratio (1:5)** |
|---|---|---|
| | **Degree** | **Degree** |
| **UG Degree :** B. Sc (Nursing) | **50** | NA |
| P. B. B. Sc (Nursing) | | NA |
| **PG Degree :** M.Sc. (Nursing) | | |
| Medical Surgical Nursing (Fundamental Nursing + Nutrition) | | |
| Community Health Nursing | | |
| Obstetric and Gynecological Nursing | | |
| Child Health Nursing | | |
| Psychiatric Nursing/Mental Health Nursing | | |

**Any Other, Please Specify:**
.................................................................................................................................................
.................................................................................................................................................
.................................................................................................................................................
.................................................................................................................................................

**Date:** ............................

**Dean/ Principal Stamp & Signature**
Principal
Anuradha College of Nursing
Chikhli, Dist.-Buldana

परमहंस रामकृष्ण मौनीबाबा शिक्षण संस्थेचे अनुराधा कॉलेज ऑफ नर्सिंग, अनुराधा नगर, साकेगाव रोड. चिखली.जि.बुलढाणा

---

बी.एस्सी (नर्सिंग) पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता वाढ करण्यास परवानगी देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय क्रमांक.एनयुआर १४१९/प्र.क्र.२१२/१९/शिक्षण-२
वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग.
गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय,मुंबई ४०० ००१.
दिनांक:- ०१ डिसेंबर,२०२१

**संदर्भ:-** १) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांचे पत्र क्र.एनयुआर/अनुराधा कॉलेज ऑफ नॉर्सिंग/बी.एस्सी नर्सिंग/ १३८९०/ई/२०२१, दिनांक २२/१०/२०२१

२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांचे पत्र क्र.एनयुआर/अनुराधा कॉलेज ऑफ नर्सिंग/बी.एस्सी नर्सिंग /बुलढाणा/तपासणी अहवाल /ई/११३७८/२०२१, दिनांक ०१/०९/२०२१

३) शासन पत्र क्र.एमईडी १४१९/प्र.क्र.२१२/१९/शिक्षण-२,दिनांक १३/०१/२०२१

४) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र .मआविवि/पीबी/युजी/पी-५/ ५५८/२०२०, दिनांक २८/१०/२०२०

५) शासन पत्र क्र.एमईडी १४१९/प्र.क्र.२१२/१९/शिक्षण-२,दिनांक २३/०७/२०१९

६) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.मआविवि/पीबी/युजी/पी-५/१३११/२०१८, दिनांक २७/१२/२०१८

**प्रस्तावना :-** परमहंस रामकृष्ण मौनीबाबा शिक्षण संस्थेचे अनुराधा कॉलेज ऑफ नर्सिंग, अनुराधा नगर, साकेगाव रोड, चिखली.जि.बुलढाणा या संस्थेतील बी.एस्सी (नर्सिंग) पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता वाढ करण्याचा प्रस्ताव संदर्भ क्र. ४ व ६ च्या पत्रान्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून , शासनास शिफारशीशिवाय प्राप्त झाला होता. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम,१९९८ मधील कलम ६४(५) मधील परंतुकान्वये प्राप्त अधिकारानुसार संदर्भ क्र.३ व ५ च्या शासन पत्रान्वये संस्थेस प्रस्ताव छाननी शुल्क भरणा करण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्ताव छाननी शुल्क भरल्यानंतर सक्षमता तपासणी करुन संदर्भाधीन क्र . १ व २ च्या पत्रान्वये संचालनालयाकडून शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असून त्याआधारे बी.एस्सी. (नर्सिंग) पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता वाढ करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**परमहंस रामकृष्ण मौनीबाबा शिक्षण संस्थेचे अनुराधा कॉलेज ऑफ नर्सिंग , अनुराधा नगर, साकेगाव रोड, चिखली.जि.बुलढाणा या संस्थेस सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षापासून पुढे नमूद केल्यानुसार बी.एस्सी. (नर्सिंग) ह्या पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता वाढ करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

| अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|
| बी.एस्सी. (नर्सिंग) | ३० वरुन ५० |

२. सदर मान्यता ही पुढील अटी व शर्तीस अधीन राहील:-

१) सन २०२१-२२ पासून सदर महाविद्यालयातील बी.एस्सी. (नर्सिंग) या पदवी अभ्यासक्रमांची विद्यार्थी प्रवेशक्षमता ५० इतकीच राहिल.

२) राज्य शासन/केंद्र शासन/मा.सर्वोच्च न्यायालय/ मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

(क्र.मा.प.)

Principal
Anuradha College of Nursing
Chikhli, Dist.-Buldana

३) शासकीय नियम/कायदा तथा मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्क आकारणीसाठी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल , त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

४) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, राज्य शासन आणि भारतीय परिचर्या परिषद यांनी बी.एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

५) महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६) सदरहू संस्थेस आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करता येणार नाही.

७) शासकीय नर्सिंग किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकांस तो सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

८) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नये.

९) संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्यांना प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडून मंजूर घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची निश्चिती शुल्क नियामक प्राधिकरणाकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

१०) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी संस्थेस विद्यार्थी प्रवेश करण्यास परवानगी देण्यापूर्वी संस्था विहित मानकांची पूर्तता करीत आहे याची खात्री करावी.

११) संस्थेने उपरोक्त वाढीव प्रवेशक्षमतेस महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर सदर संस्थेत विद्यार्थी प्रवेश करावेत.

३. सदर आदेश हे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४(५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अजित सासुलकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई
सचिव,शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई
प्राचार्य, परमहंस रामकृष्ण मौनीबाबा शिक्षण संस्थेचे अनुराधा कॉलेज ऑफ नर्सिंग, अनुराधा नगर, साकेगाव रोड, चिखली,जि.बुलढाणा
निवडनस्ती (शिक्षण-२)

Principal
Anuradha College of Nursing
Chikhli. Dist.-Buldana